क्रमांक एनएपी/३४/एसआर/०५/२०१८
तहसीलदार कार्यालय दोडामार्ग
दिनांक - २२/०३/२०१८

वाचले-

१. श्री. भारत ठकरान, रा. पणजी गोवा, करीता श्री. सुनिल शंकर गवस, रा. उसप ता. दोडामार्ग यांचा दिनांक २४/०१/२०१८ चा अर्ज
२. मंडळ अधिकारी तळकट यांचेकडील क्रं मं.अ.दो/एलएनए/कावि/दिनांक २६/०२/२०१८ चा प्रस्ताव व त्यालगतचे कागदपत्र
३. या कार्यालयाकडील बिनशेती आदेश क्रमांक एनएपी/ ३४ /एसआर/०१/२०१७. दिनांक २३/११/२०१७
४. महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ क
५. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८

# आदेश

गाव मौजे वझरे, ता. दोडामार्ग येथील स.नं १५९ हि.नं ३ क्षेत्र १.४५.०० पो. ख. ०.१०.० आकार रु. ०.४६ , श्री. भारत ठकरान यांचे नावे असून ही मिळकत रत्नागीरी सिंधुदुर्ग मंजूर प्रादेशिक योजनेनुसार नगरपरिषद/ नगरपंचायत/इतर प्राधिकरण क्षेत्राबाहेर असुन सदर मिळकतीतील बांधकामाखालील क्षेत्र १३९५०.०० चौ.मी व खुले क्षेत्र ४००८.०० चौ.मी असून सदर बांधकाम परवानगी मिळावी म्हणून अर्ज सादर केलेला आहे.

सदर अर्जकामी झालेल्या चौकशीवरुन असे दिसुन आले की,

१. सदर जमिन कोणत्याही सरकारी किंवा सार्वजनिक कायद्याखाली संपादन करणेचे काम चालू नाही व नजीकच्या काळात संपादन करण्याची शक्यता आहे असे दिसत नाही.
२. जमिन प्रादेशिक विकास आराखड्यात कोणत्याही विशिष्ट प्रयोजनासाठी आरक्षित केलेली नाही आणि संबधित प्राधिकरणाची जमिनीच्या निवासी प्रयोजनासाठी वापर करण्यास हरकत नाही.
३. सदर जमिन ज्या कारणासाठी वापरली जाणार आहे त्यासाठी ती आरोग्यदृष्टया योग्य असल्याबद्दल जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी अभिप्राय दिलेला आहे.
४. अर्जदाराने हजर केलेले बांधकामाचे नकाशे महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीचे बिनशेती वापरात (रुपांतर) नियम १९६९ मधील नमूना २ व ३ प्रमाणे आहेत.
५. सदर जमिनीवरुन विजेच्या उच्चपोषण तारा व त्यांचे नियोजित इतारत व बांधकाम यांच्यापासून अंतर पुरेसे आहे.
६. इमारत विषयक पथकिनारवर्ती नियमानूसार सदर नियोजित बांधकाम आहे.
७. सदर जमिनीवर ज्या लोकांचे वहिवाटीचे हक्क आहेत. त्यांची बांधकाम परवानगी देण्याकामी

हरकत नाही.

८. ज्या शर्तीवर बांधकाम परवानगी देण्यात येणार आहे. त्या शर्ती आपल्यावर बंधनकारक असल्याबद्दल अर्जदार यांनी कबूल केले आहे.

वरील मुद्दे विचारात घेवून अर्जदाराला बांधकाम परवानगी देण्यास हरकत नाही.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८ मधील शक्तीचा वापर करुन, मी, तहसीलदार दोडामार्ग श्री. भारत ठकरान करीता श्री. सुनिल शंकर गवस, रा. उसप ता. दोडामार्ग यांना गाव मौजे वझरे, ता. दोडामार्ग येथील स.नं १५९ हि.नं ३ चे क्षेत्रात खाली नमूद केलेप्रमाणे सोबतचे नकाशामध्ये दाखविल्याप्रमाणे बांधकाम करण्यास परवानगी खालील शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर बांधकाम परवानगी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमा खालील नियमांना अधिन ठेवून देण्यात येत आहे.

२. सदर बांधकाम परवानगी ज्या प्रयोजनासाठी दिलेली आहे, त्याच प्रयोजनासाठी तिचा वापर करणेचा आहे. बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.

३. स्थळदर्शक नकाशावर दाखविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील व बाजुची सामासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर किमान असली पाहिजेत.

४. नियोजीत इमारत तळमजला अधिक दोन मजले यापेक्षा जास्त असु नये. इमारतीची उंची १२.०० मी पेक्षा जास्त असता कामा नये.

५. विषयांकित जागेची उपअधिक्षक , भूमि अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन घेणे अर्जदारावर बंधनकारक आहे.

६. नियोजित इमारतीसाठी आवश्यक असणा-या पाण्याची सोय, सांडपाण्याची व मैला निर्मूलनासाठी व्यवस्था नसल्यास प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदारने केली पाहिजे व अशी व्यवस्था जवळपासचे विहीरीपासून किमान ३०.४८ मी. अंतरावर असणे आवश्यक आहे.

७. प्रस्तावित बांधकामामुळे वहिवाटीचा मार्ग , वीजवाहक मार्ग, वीजवाहक तारा, नदी , नाले, पावसाळी पाण्याचे नैसर्गिक प्रवाह इत्यादींना बाधा येता नये. तसेच त्यापासून योग्य ती सामासिक अंतरे सुटत असणे यासाठी योग्य ती तरतूद करणे अर्जदारावर बंधनकारक राहिल

८. नियोजित बांधकामाखालील भुखंडाअंतर्गत असणा-या झाडांची तोड करणेची आवश्यकता असल्यास संबधित प्राधिकारणाची पूर्व परवानगी घेणेची आहे. तसेच कमीत कमी १० झाडे लावून ती जगविली पाहिजेत.

९. बांधकाम करावयाच्या भूखंडाच्या हद्दीबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्यांची इजमेंट

राईटबाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांचेवर राहिल.

१०. विषयांकित जागेतील बांधकाम करताना IScode-13920-1893 भूकंपरोधक आरसीसी डिजाईननुसार बांधकाम घटकाचे डिझाईन अर्हताप्राप्त स्ट्रकचरल इंजिनिअर यांचेकडून करुन घेणे आवश्यक असून त्यांच्या देखरेखीखाली नियोजीत इमारतीचे बांधकाम पूर्ण करणेचे अर्जदार / विकासकर्ता यांचेवर बंधनकारक राहील.

११. इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेनंतर एक महिन्याचे आंत अर्हताधारक वास्तुशास्त्रज्ञ अभियंता / सर्वेक्षक यांच्या मार्फत इमारत पूर्ण झाल्याचे या कार्यालयास कळविणे आवश्यक असून या कार्यालयाकडून इमारत वापर प्रमाणपत्र घेणेचे आहे.

१२. जर बांधकाम प्रकरणी दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आहे असे आढळुन आल्यास मंजूरी रद्द समजण्यात येईल.

१३. नियोजित बांधकामात मंजूरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास या कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१४. इमारतीचे बांधकाम चालू असताना कामासाठी वापरावयाच्या कोणत्याही प्रकारचा माल रस्त्यावर अगर गटारात ठेवता कामा नये.

१५. इमारतीचा वापर बदलावयाचा असल्यास त्यास सक्षम अधिका-याची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१६. बांधकामासाठी पाण्याची तरतूद परस्पर केली पाहिजे.

१७. सदर बांधकाम परवानगी या आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी वैध राहिल.

१८. सोबतचे नकाशामध्ये नमूद जे मंजूर नकाशा आहेत त्याप्रमाणे बांधकाम करावयाचे आहे.

ठिकाण- दोडामार्ग

दिनांक- २२/०३/२०१८

(रोहिणी रजपूत)
तहसीलदार दोडामार्ग

प्रत- १. श्री. भारत ठकरान, रा. पणजी गोवा व इतर ... श्री. सुनिल शंकर गवस , रा. उसप, ता. दोडामार्ग यांजकडे मंजूर नकाशासह अग्रेषित

२. तलाठी वझरे यांजकडे जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

३. उपअधिक्षक भूमी अभिलेख , दोडामार्ग यांजकडे जरूर त्या कार्यवाहीसाठी रवाना.

सही
xxx
(रोहिणी रजपूत)
तहसीलदार दोडामार्ग